# गजानन ओंकारा

गजानना, ओंकारा,
चरणी तुझिया आज अर्पितो,
भावसुमन माला !!

कार्यारंभी सकल पूजिती
नैवेद्यासही मोदक देती
करुनी आरती, तुज आळविती
दयाघना मोरेश्वरा !!

शुद्ध चतुर्थी तू विनायक
वद्य चतुर्थी मानिला अंगारक
घोर संकटी तूच तारिसी
भक्तवत्सल करुणाकरा !!

सकल कलांचा तू अधिपती
सकल विद्यांचा तू विद्यापती
त्रिभुवनातील दिव्य शक्ती तू
पाश अंकुश धरा !!

धुम्रवर्ण तू एकदंत तू
वक्रतुण्ड तू गजवदन ही तू
अगम्य जरी हे दर्शन लोभस
भुलविते सकल जना !!

गजानन ओंकारा,
चरणी तुझिया आज अर्पितो
भावसुमन माला !!



संकलित
मेधा आसरकर